जा.क्र.नांवाशमनपा/नसका/CR- 48/2018
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक:- 09.02.2018

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**

**सर्वसाधारण सभेची सूचना**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनसूची ``ड`` चे प्रकरण-२ मधील नियम क्रं. 1 अन्वये

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची (ड) च्र प्रकरण-2 मधील नियम क्रं 1 अन्वये प्राप्त अधिकारानुसार **मा. महापौर, सौ. भवरे शिलाबाई किशोर** यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्व साधारण सभा **दिनांक 17.02.2018 रोजी सकाळी 11.00 वाजता नावाशमनपाकेच्या मुख्य प्रशासकिय इमारतीतील चौथ्या मजल्यावरील कै. शंकरराव चव्हाण सभागृहात आयोजीत केली आहे.**

करिता विनंती की, प्रस्तावित सभेस निर्धारीत समयी निर्दिष्ट ठिकाणी उपस्थित राहून सहकार्य करावे.

**स्वाक्षरीत/-**

**( मा. महापौर यांच्या मान्यतेने )** **नगरसचिव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

**प्रति**

**श्री/श्रीमती -------------------------------**

**सदस्य /सदस्या,**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**आयुक्त यांच्याकडून प्राप्त कार्यालयीन प्रस्ताव**

**विषय क्रं.01:-** दिनांक 19.12.2017 रोजी मागील झालेल्या मनपा सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत

**विषय क्रं.02:-** मा. निर्वाचन अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांचे पत्र दिनांक 19.12.2017 अन्वये नांदेड जिल्हा नियोजन समिती निवडणूक-2017 च्या मोठे नागरी निर्वाचन क्षेत्राकरिता रिक्त असलेल्या 07 जागांवर सर्व प्रवर्गामधील सर्व सात जागांकरीता बिनविरोध निवडून आले त्याची नोंद घेणे बाबत.

**विषय क्रं.03:-** श्री सुहास रघुनाथराव सोनुले, कंत्राटी सिटी प्रोगाम मॅनेजर यापदावर एकत्रीत वेतन रु. 18,000/- यांच्या सेवेची मुदत दि. 30.12.17 रोजी संपली असुन त्यांच्या सेवेत दि. 31.12.17 चा तांत्रीक खंड देवुन दि. 01.01.18 ते 29.06.18 पर्यंत मुदतवाढ देणे बाबत.

**विषय क्र.04:-** मनपा हद्दीत नांदेड शहराच्या मंजूर विकास योजनेनुसार मौ. असदुल्लाबाद सर्व्हे नं. 34 मध्ये आरक्षणाच्या जागेत बत्याच प्रमाणात अनाधिकृत विकास झाला. तसेच गुंठेवारी अंतर्गत कांही भुखंड नियमित केले आहे तर कांही भुखंडास बांधकाम परवानगी देण्यात आली त्यामुळे सदर जागा संपादित करुन आरक्षण विकसित करणे शक्य नाही. करिता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 नुसार सदर आरक्षण वगळणे बाबतच्या निर्णयास्तव.

**विषय क्रं.05:-** जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियान अंतर्गत रस्ता क्रं. 06 – दरबार मस्जीद ते किल्ला रस्त्यास सुधारीत प्रशासकिय व आर्थीक मान्यता प्रदान करणे बाबत.

**स. सदस्यांचे प्रस्ताव/सुचना**

**विषय क्रं.06:-**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिके मार्फत हबीबीया कॉलनी येथे मनपाकेची प्राथमिक शाळा चालविण्यात येते सदरील शाळेत इयत्ता ०१ ते ०८ वर्गा पर्यंत विद्यार्थांना शिक्षण देण्यात येते. सदरील शाळेत विद्यार्थ्याची संख्या किती व शिक्षकांची संख्या कमी पडत असल्यास ती तात्काळ नियमानुसार भरण्यात यावी हया करीता सर्वसाधारण सभेत मान्यता घेण्यात यावी.

**सुचक** :- अरशीया कौसर मोहम्मद हबीब **अनुमोदक** :- शमीम बेगम शेख जावीद

**विषय क्रं.07:-** अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्या बाबत महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाने दिनांक 21.09.2017 रोजी काढलेल्या शासन निर्णयात अनुकंपा नियुक्ती योजने संदर्भात तरतुदी हया केवळ शासकिय कर्मचा-यां पुरत्याच सीमीत आहेत. अनुकंपा नियुक्तीवर प्रलंबित असलेल्या सर्व प्रकरणात नियमानुसार पडताळणी करुन रिक्त असलेल्या पदावर तात्काळ नियुक्ती देणे.

**सुचक** :- आनंद चव्हाण, मो. साबेर चाऊस **अनुमोदक** :- शबाना बेगम मो. नासेर

**विषय क्रं.08:-** नावाशमनपा हद्दीतील प्रभाग क्रं. 12 उमर कॉलोनी हा भाग 100% अल्पसंख्यांक बहुल प्रभाग असुन या प्रभागाची लोकसंख्या जवळपास 28,000 एवढी असून सदर प्रभाग हा अविकसीत असून या प्रभागातील उमर कालोनी, एकबाल नगर, हीलालनगर इत्यादी भागात कसल्याही प्रकारची मुलभुत सुविधा उपलब्ध नसल्यामुळे येथील नागरीकांना अत्यंत त्रास सोसावा लागत आहे. करिता सदर भागात मुलभुत सुविधा (रस्ते / नाली) ची कामे करण्यासाठी अल्पसंख्यांक भागाचा विकास करण्यासाठी शासनाकडून अल्पसंख्यांक निधी उपलब्ध करुन घेण्यासाठी शासनाकडे शिफारस करणे.

**सुचक** :- अब्दुल सत्तार अ. गफुर **अनुमोदक** :- अ. रशीद अ. गणी

**स्वाक्षरीत/-**

**नगरसचिव**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**